सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३१० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## निकाल आल्यावर कुणाला दोष द्यायचा याची काहींची तयारी सुरु...; मार्कर मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नागपूर**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत हे मतदान सुरु असणार आहे. राज्यातील सर्व बडे नेते मतदानाचा हक्क बजावताना दिसत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागपूरमध्ये महानगरपालिकेसाठी मतदान केले. यावेळी त्यांची पत्नी अमृता फडणवीस देखील सोबत होत्या. मतदानानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी मतदानात मार्करने शाई लावण्याच्या वादावर भाष्य केले.



**मतदानावेळी मार्कर पेन वापरण्यावरून...**

या सर्व गोष्टी इलेक्शन कमिशन ठरवतात याआधीही अनेक वेळा मार्कर पेन वापरण्यात आला आहे जर कोणी याबाबत आक्षेप घेत असेल तर इलेक्शन कमिशन ने या संदर्भात लक्ष दिले पाहिजे पण मला असं वाटतं की काही लोक उद्याच्या निकालाचा अंदाज लावून आजपासूनच काही गोष्टींवर मुद्दाम भाष्य करत आहेत. उद्याचा निकाल आल्यानंतर कशाला दोष द्यायचा याची तयारी करत आहेत हे यातून स्पष्ट दिसून येत आहेत, असा खोचक टोला फडणवीसांनी लगावला.

मतदान हा लोकशाहीचा आहे. सर्वांनी मतदान केलेच पाहिजे. मतदान हे केवळ अधिकार नव्हे तर कर्तव्य आहे. मतदान न करणे हा लोकशाहीचा अपमान आहे. आमचे उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर काँग्रेसकडून भ्याड हल्ला झाला. निवडून येता येत नाही म्हणून ठोकशाही करणे हा वाईट आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**निवडणूक आयोगावर संशय घेणे अयोग्य – मुख्यमंत्री**

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान केले यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावर कुठल्याही प्रकारचा संशय घेणे अयोग्य असल्याचे म्हटले आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा मार्कर पेन संदर्भातील आरोप केले होते. त्यावर फडणवीस यांनी भाष्य केले. ते म्हणाले, सर्व गोष्टी निवडणूक आयोगाकडून ठरविण्यात येतात. यापूर्वीही अनेक वेळेला मार्कर पेन वापरला आहे. याबद्दल हरकत असेल तर आयोगाने याकडे लक्ष द्यावे. विरोधी पक्षांनी नवीन स्क्रिप्ट लिहिली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना झापले तरी पुन्हा पुन्हा तीच स्क्रिप्ट वापरतात. या निवडणुकीमध्ये आमचा विजय निश्चित आहे. आमचे विरोधी पक्ष उद्या काय कारण सांगायचे? याची प्रॅक्टिस करत आहे.


## सरसंघचालक मोहन भागवतांनी बजावला मतदानाचा अधिकार

### कुणाला मतदान करायला हवं? हेही सांगितलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नागपूर**

निवडणुका या लोकशाहीतंत्राचा एक भाग आहे आणि ते जनतेचे करतव्यही आहे. त्यामुळे जनहिताचा विचार करून आपल्याला योग्य वाटतो, त्या उमेदवाराला मत देणे, हे जेव्हा-जेव्हा निवडणुका असतात तेव्हा तेव्हा प्रत्येकाने करायला हवे. त्या दृष्टीने आणि त्या दिवसाचे ते पहिले कर्तव्य असते. म्हणून मी पहिले येऊन नंबर लावला. असे राष्ट्रीय स्वयंसेवक सघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटले आहे. त्यांनी आज नागपूर महानगर पालिकेसाठी मतदान केले. यानंतर ते पत्रकारांसोबत बोलत होते.

भागवत पुढे म्हणाले, लोकांनी मतदानासाठी बाहेर पडायला हवे. हे तुम्हीही सांगत असता, निवडणूक आयोगही सांगत असतो आणि आम्हीही सांगत असतो. आता परिणाम जेव्हा होईल तेव्हा होईल.



**अराजक, राजा नसणे हे सर्वात वाईट...**

नोटाला का मतदान करू नये, यासंदर्भात बोलताना भागवत म्हणाले, नोटा म्हणजे, आपण सर्वांना रिजेक्ट करतो, तेव्हा आपण नको असलेल्या माणसाला प्रमोट करतो असे होते. यामुळे नोटा नागरिकांच्या वैतागाच्या दृष्टीने दिलेला ऑप्शन असला तरी, त्यातल्या त्यात चांगला माणून. अराजक, राजा नसणे हे सर्वात वाईट, असे पितामह भिष्मांनी म्हटले आहे. त्यामुळे कुणीच नाही, त्यापेक्षा कुणीतरी हवा. देश चालण्याच्या दृष्टीने ते महत्वाचे आहे.

दरम्यान, राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी आज मतदान होत असून मुंबईसह राज्यातील २८६९ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. या निवडणुकीसाठी १५ हजार हून अधिक उमेदवार रिंगणात आहेत.

## निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारावर सडकून टिका

### निवेदिता सराफ मतदार यादीत तासभर नाव शोधत होत्या... वैतागल्या, एकाच कुटुंबातील तीन ठिकाणी नावे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानादरम्यान आज विलेपार्ले येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला. प्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता सराफ यांना मतदार यादीतील गोंधळामुळे मतदानासाठी तब्बल एक तास केंद्रावरून केंद्रावर चकरा माराव्या लागल्या. निवडणूक आयोगाचा कारभार अत्यंत ढिसाळ आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.



मी मतदान केंद्रावर गेले तेव्हा तेथील मतदार यादीत माझे नावच नव्हते. मला २५ नंबरला जाण्यास सांगण्यात आले. तिथे नाव सापडले. तुम्ही सगळ्या सोसायट्यांचे गट पाडलेले आहेत, त्या गटातील मतदार या मतदान केंद्रात येऊन मतदान करतील असे ठरविले आहे. मग का आमच्या बिल्डिंगची नावे नाहीत. माझे नाव आहे, पण सिरीज नंबरच लिहिलेला नाही. दुसरीकडे २५ नंबर असल्याचे सापडले. मी तिकडे गेले पण तोवर निवडणूक कर्मचारी गेली होती, अशी टीका सराफ यांनी केली. मोबाईल आतमध्ये नेऊ देत नाही, नाहीतर फोटो काढला असता, असे त्या म्हणाल्या.

निवडणूक आयोगाच्या या नियोजनाअभावी अनेक सामान्य मतदारांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे चित्र आज मुंबईत पाहायला मिळाले. एवढेच नाही तर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि कुटुंबीयांचे देखील मतदार यादीत नाव नव्हते. तासभर शोधल्यानंतर त्यांचे नाव सापडले आणि त्यांनी मतदान केले.

## उद्याला विजयाचा गुलाल कोण उधळणार?

### सर्वच राजकीय पक्षांनी केली विजयाची जय्यत तयारी

### दुपारी ३.३० पर्यंत ४०.६२ टक्के मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुका गुरुवारी मोठ्या उत्सहात पार पडल्या अमरावतीकर नागरिकांनी मतदानात सहभागी होत मतदानाचा हक्क बजावला उद्याला या मतदानाची मतमोजणी होणार आहे आणि त्या मतमोजणीत कोणता राजकीय पक्ष कि अपक्ष बाजी मारतात या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अमरावती महानगर पालिकेच्या ८७ जागांसाठी तब्बल ६६१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.मतदान सुरक्षित पणे पार पडावे या करीत २७०० पोलिसांचा विशेष बंदोबस्त आज शहरात लावण्यात आला होता. पोलीस आयुक्त राकेश ओला स्वतः जातीने प्रत्येक गोष्टीवर बारीकर लक्ष देऊन होते.सकाळी मतदान झाल्यावर काही ठिकाणी ईव्हीएम मशीन बंद पडल्याच्या घटना समोर आल्यात मात्र त्यानंतर तो प्रश्न



प्रशासनाने लगेच निकाली काढला. महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी ४४ प्लस चा आकडा जो पक्ष सहज पार करेल त्या पक्षाचा महापौर अमरावती महानगरपालिकेवर विराजमान होणार आहे सर्वच राजकीय पक्षांनी विजयाची जोरदार तयारी केली असून उद्याला कोणत्या पक्षाला किती बलाबल मिळते हे बघणे औसुक्याचे ठरणार आहे. दुपारी ३.३० पर्यंत ४०.६२ टक्के मतदान झाले होते. सायंकाळच्या सुमाराच अनेक मतदार हे आपल्या मतदानाचा हक्क बजवतात त्यामुळे मतदानाची टक्केवारी हि ६५ ते ७० टक्के पर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.उद्या सकाळी १० वाजल्यापासून मतमोजनीला सुरुवात होणार आहे. तर दुपारी ४ वाजेपर्यंत संपूर्ण मातमोजणीच चित्र स्पस्ट होणार आहे. एकुण मतमोजणी ही १४ टेबलवर होणार असून २ टेबल हे टपाल मतमोजणीसाठी ठेवण्यात आले आहे. सुरुवातीला टपाल मतमोजणी होणार असून त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

## पाच सुना,सासू,आणि मुलगी, भीषण अपघातात दुर्देवी मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५फतेहपूर शेखावटी**

सासू, पाच सुना आणि मुलगी अशा एकाच कुटुंबातील सात महिलांचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना राजस्थानमध्ये घडली आहे. फतेहपूर शेखावटी येथे झालेला हा अपघात एवढा भीषण होता की, घटनास्थळावरील विदारक दृश्य पाहून पाहणाऱ्यांचे मन हेलावले आणि डोळ्यांत पाणी आले.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार या कुटुंबाच्या नात्यातील एका महिलेचं निधन झालं होतं. तिच्या अंत्यसंस्कारामध्ये सहभागी होऊन हे कुटुंबीय काही वाहनांमधून माघारी परतत होते. त्यात या सर्व महिला एका कारमध्ये बसल्या होत्या. ही कार राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर हरसावा गावाजवळ आली असताना कारच्या चालकाने भरधाव वेगात ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ही कार आधी एका पीकअपवर आदळली आणि तशीच फरफटत जाऊन समोरून येणाऱ्या ट्रकमध्ये घुसली.

या अपघातात कारचा पूर्ण चेंदामेंदा झाला. तसेच कारमधून प्रवास करणारी वृद्ध सासू, पाच सुना आणि मुलगी अशा मिळून ७ जणांचा मृत्यू झाला. तर एक तरुणी आणि ड्रायव्हर गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये सासू मोहिनी देवी आणि चंदा देवी, तुलसी देवी, बरखा देवी, आशा देवी, संतोष देवी या सुना आणि इंदिरा या मुलगीचा समावेश होता. तर सोनू आणि कारचालक वसीम हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या अपघाताबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार हरसावा गावाजवळ ही कार पोहोचली असतानाच कारचालकाने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. याचदरम्यान, भरधाव वेगामुळे कारवरचं त्याचं नियंत्रण सुटलं आणि ही कार पिकअपवर आदळली. त्यानंतर समोरून येणाऱ्या ट्रकमध्ये जाऊन घुसली. अपघाताचा आवाज ऐकताच आजूबाजूच्या लोकांनी आणि तिथून जात असलेल्या वाहन चालकांनी मदतीसाठी धाव घेतली. तसेच गंभीर जखमींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र अपघात एवढा भीषण होता की त्यात यापैकी काही महिलांचा आधीच मृत्यू झाला होता.

दरम्यान, अंत्यसंस्काराहून परतताना कुटुंबीयांनी कारचालकाला वाहन हळू चालवण्याबाबत बजावले होते. मात्र त्याने भरधाव वेगात कार चालवली आणि ही भीषण दुर्घटना घडली.


## शाई पुसून पुन्हा मतदान शक्य नाही, कारण...; मार्कर पेन वादावर निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी आज सर्वत्र मतदान सुरु आहे. सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत सर्व मतदार आपला हक्क बजावत आहेत. याचदरम्यान, मतदानाच्या वेळी लावण्यात आलेल्या मार्कर पेनचा मुद्दा चर्चेत आला आहे. ठाकरे बंधू आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून मार्कर पेनद्वारे शाई लावण्याच्या गोष्टीचा कडाडून विरोध करण्यात आला आहे. तर, मार्कर पेनने शाई लावण्याचा निर्णय हा निवडणूक आयोगाचा असून, आक्षेप असेल तर त्याबाबत कारवाई व्हावी, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. याचदरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने या मुद्द्यावर परिपत्रक जारी केले असून, मार्कर पेनमुळे मतदार पुन्हा मतदान करू शकणार नाहीत असा विश्वास व्यक्त केला नाही.

**निवडणूक आयोगाच्या पत्रकात लिहिले आहे की...**

बोटावर लावण्यात आलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे




हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचे आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे. बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. मतदाराने मतदान केल्यानंतर त्याबाबत नोंद घेण्यात आलेली असते. त्यामुळे केवळ शाई पुसून गैरकृत्य केलेल्या मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबत सतर्कता बाळगण्याच्या सूचना पुन्हा एकदा सर्व संबंधिताना देण्यात आल्या आहेत, असे आयोगाने म्हटले आहे.

**मार्कर पेन वापराबाबत...**

मतदाराच्या बोटाला शाई लावण्याकरता मार्कर पेनच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर २०११ रोजी आणि २८ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. या आदेशानुसार मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल, अशा पद्धतीने मार्कर पेनने शाई लावण्यात यावी; तसेच नखावर आणि नखाच्या वरच्या बाजुला त्वचेवर तीन-चार वेळा घासून शाई लावावी, अशा सूचना यापूर्वीदेखील देण्यात आल्या असून आणि त्या मार्कर पेनवरही नमूद केल्या आहेत. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचे गैरकृत्य करू नये, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

## आता नागरिकच नेत्यांना धडा शिकवत आहेत, ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे मत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अकोला**

लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात आज वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर आणि राष्ट्रीय नेत्या प्रा.



अंजलीताई आंबेडकर यांनी अकोला येथे आपला मतदानाचा हक्क बजावला. स्थानिक मतदान केंद्रावर जाऊन त्यांनी आपले मत नोंदवले. मतदान केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले.

**आता जनताच नेत्यांना धडा शिकवत आहे**

मतदानानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ड. प्रकाश आंबेडकर यांनी राज्यातील सध्याच्या राजकीय स्थितीवर आणि मतदारांच्या जागरूकतेवर भाष्य केले. ते म्हणाले की, सध्याच्या निवडणुकीत एक सकारात्मक चित्र पाहायला मिळत आहे. आता नागरिकच नेत्यांना सुधारत असून त्यांना धडाही शिकवत आहेत.

पुढे ते म्हणाले, ज्या ठिकाणी प्रस्थापितांकडून पैसे वाटण्याचे प्रयत्न झाले, तिथे जागरूक नागरिकांनी त्यांना हाकलून लावले आहे.सरसकट पैसे वाटण्याच्या प्रकारांना आता जनतेकडून विरोध होत आहे. काही ठिकाणी वाटण्यात आलेल्या साड्या ते महिलानी जाळल्या, तर पैसे घेऊन आलेल्यांना पिटाळून लावले. हे लोकशाहीसाठी सुचिन्ह असल्याचे त्यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या प्रा. अंजलीताई आंबेडकर यांनीही यावेळी आपले मत व्यक्त केले. निवडणुकीच्या प्रचारात मूळ मुद्दे भरकटवण्याचे कितीही प्रयत्न झाले असले, तरी मतदारांनी त्याला बळी न पडता स्थानिक प्रश्नांना महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांनी स्थानिक प्रश्न आणि विकासाचे मुद्दे मांडले, त्यांनाच मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, असे चित्र सध्या महाराष्ट्रात दिसून येत असल्याचे मत प्रा. अंजलीताई आंबेडकर यांनी व्यक्त केले.

## अमरावतीत लोकशाहीचा खून होतोय, माजी आ. अभिजीत अडसूळ यांचा आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरूवारी मतदान सुरू असताना काही ठिकाणी गोंधळाची स्थिती बघायला मिळत आहे. अनेक मतदान केंद्रांवर मतदान यंत्रे उलट्या क्रमाने ठेवण्यात आली असून ही लोकशाहीची हत्या असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी केला आहे.

अभिजीत अडसूळ म्हणाले, निवडणूक आयोगाने जाणून बुजून संगनमत करून मतदान यंत्रे ही उलट्या क्रमाने ठेवली आहेत. सामान्यपणे अ, ब, क आणि ड या क्रमाने मतदान यंत्रे ठेवण्याऐवजी ती ड, क, ब आणि अ अशा स्थितीत ठेवण्यात आली आहेत. यावर कुणीही उत्तरदायित्व स्वीकारण्यास तयार नाही. ही लोकशाहीची हत्या आहे. जिल्हाधिकाऱ्यांपासून ते निवडणूक आयोगाचे सर्व अधिकारी त्या ठिकाणी अत्यंत चुकीच्या पद्धतीने काम करीत आहेत. आपण हिंदुस्थानात राहतो. आपण वाचायला सुरूवात डावीकडून उजवीकडे करतो. खऱ्या अर्थाने अबकड अशा पद्धतीने मतदान यंत्रे लावली गेली पाहिजेत. विरोधकांना आपला पराजय दिसायला लागला आहे, म्हणून चुकीच्या पद्धतीने निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतदान यंत्रे उलट्या क्रमाने लावण्याचे कारस्थान रचण्यात आले.

संपादकीय ......

# अमेरिकेची बदलती भूमिका

*अमेरिका आणि भारत यांच्यातील विशेष व्यापार कराराबाबत प्रदीर्घ काळ वाटाघाटी सुरू असल्या, तरी तो अद्याप होऊ शकलेला नाही. ट्रम्प यांच्या हुलकावण्यांमुळे तो रखडला आहे. 'भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दूरध्वनी न केल्यामुळे तो अडकला आहे. स्थानकातून रेल्वे सुटून गेल्यानंतर भारत तेथे दाखल झाला,' असे धक्कादायक वक्तव्य अमेरिकेचे व्यापार मंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी अलीकडेच केले आहे. यावरून ट्रम्प यांचे मानापमान नाटक कसे रंगले आहे, हे कळायला बरीच जागा आहे; मात्र ट्रम्प आणि मोदी यांच्यात २०२५ मध्ये दूरध्वनीवरून अनेकदा परस्पर संपर्क झाला होता, याचा तपशीलच जाहीर करून भारताने लुटनिक यांचा मुखभंग केलाच.*

*ट्रम्प यांची मनमानी कोणत्या पातळीवर पोहोचली आहे, याची ती साक्ष ठरावी. आता 'अमेरिकेसाठी भारताइतका महत्त्वाचा दुसरा कोणताही देश नाही. दोन्ही बाजूंकडून व्यापार करार निश्चित करण्यासाठी सक्रिय प्रयत्न सुरू आहेत', असे उद्गार अमेरिकेचे भारतातील नवीन राजदूत सर्गेइ गोर यांनी नवी दिल्लीत काढले आहेत. येणार्या काही महिन्यांत आणि वर्षांत उभय देशांना जवळ आणण्यासाठी मी महत्त्वाची पावले उचलणार आहे. दोन्ही देशांनी एकमेकांचे सामर्थ्य आणि नेतृत्वाचा सन्मान करून, धोरणात्मक भागीदार म्हणून काम केले पाहिजे, असे गोर यांचे मत आहे. एकूण, लुटनिक यांना चोख उत्तर दिल्यानंतर अमेरिकेला शहाणपण आले असेल, तर ते बरेच आहे. 'पॅक्स सिलिका' म्हणून ओळखल्या जाणार्या महत्त्वाच्या खनिजे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील अमेरिकाप्रणीत धोरणात्मक आघाडीत सहभागी होण्यासाठी गोर यांनी भारतास निमंत्रण दिले.*

*या आघाडीत सामील होणे भारताच्या दृष्टीने कदाचीत लाभदायकच ठरू शकेल. वास्तविक, गेल्या काही महिन्यांपासून ट्रम्प प्रशासनाने आयात शुल्क आणि एच-१बी व्हिसाच्या मुद्द्यावरून भारतावर दबाव आणला होता. भारत-अमेरिकेतील मतभेदांमुळे गेल्या दोन दशकांतील संबंधांचा सर्वात वाईट काळ पाहायला मिळाला. भारताबरोबर व्यापार करार लवकर पूर्ण करण्यास आम्ही बिलकूल उत्सुक नाही, असे लुटनिक यांनी जाहीर केले होते. त्यामुळे वातावरण गढूळ झाले असतानाच भारत हा सर्वात मोठा लोकशाही देश आहे. व्यापार करार पूर्णत्वास नेणे सोपे नसले, तरी आम्ही तो करण्यासाठी कटिबद्ध आहोत. व्यापाराव्यतिरिक्त सुरक्षा, दहशतवादविरोधी लढा, ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य आदी महत्त्वाच्या क्षेत्रांतही एकत्र काम करत राहू, असे गोर यांनी म्हटले आहे.*

*ट्रम्प आणि मोदी यांच्यातील मैत्री अस्सल असून, त्यामुळे मतभेद दूर होतील, असा आशावाद गोर यांनी जागवला. थोडक्यात, भारताने ठाम भूमिका घेतल्यामुळे अमेरिकेने लवचिकता दाखवली असावी, त्यावर पूर्ण विश्वास टाकणे आजघडीला कठीण असले, तरी व्यापार कोंडी फुटण्याची आशा दुणावली आहे. ट्रम्प यांच्या कारकिर्दीस एक वर्ष पूर्ण होत असून, या कालावधीत त्यांनी जगाच्या अर्थकारणास झळ पोहोचवणारे अनेक निर्णय घेतले. आयात शुल्कात वाढ, माल आयात करण्यावर संख्यात्मक नियंत्रणे, व्हिसावर निर्बंध असे अनेक एकतर्फी निर्णय त्यांनी जाहीर केले. त्यामुळे जागतिक व्यापारास फटका बसला.*

*अमेरिकेची अर्थव्यवस्था ३.२ टक्के गतीने वाढेल, अशी अपेक्षा होती; परंतु ती ४.३ टक्के या गतीने वाढत आहे. मुख्य म्हणजे बहुतेक देशांमधील आयात महाग झाल्यामुळे अमेरिकेचा आयातीवरील खर्च कमी झाला. देशांतर्गत मागणी कमी झाली असली, तरी ही उणीव वाढती निर्यात आणि संरक्षण क्षेत्राचा विस्तार यातून भरून निघाली. त्यामुळे सप्टेंबर २०२५ मध्ये संपलेल्या तिमाहीत अमेरिकेतील व्यक्तिगत उपभोग खर्चाचा किंमत निर्देशांक २.८ टक्क्यांनी वाढला. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची भरभराट होणे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हिताचे आहे. कारण, त्यामुळे भारतातील तंत्रज्ञान व सेवा उद्योगाची मागणी वाढते. शिवाय अमेरिकेतून भारतात येणार्या 'रेमिटन्सेस'मध्ये म्हणजे पैशाच्या ओघातही वाढ होते.*

*अमेरिकेने भारतावरील आयात शुल्कात वाढ केली असली, तरीदेखील नोव्हेंबरात भारतातून जहाजाने जाणार्या मालाच्या निर्यातीत वाढ झाली; परंतु मध्यंतरी अमेरिकेने व्यापार कराराची चर्चाच खंडित केली होती. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे २५ टक्के दंडही आकारला. ट्रम्प यांनी भारतावर एकूण ५० टक्के आयात शुल्क लादले. उभय देशांत वाटाघाटी प्रगतिपथावर आहेत, असे सातत्याने सांगितले जात आहे. केंद्रीय व्यापारमंत्री पीयूष गोयल संभाव्य कराराबद्दल आपण आशावादी आहोत, असे म्हणत आले आहेत. भारताने आपल्या शेतमालाची बाजारपेठ खुली करावी, यासाठी अमेरिका दबाव आणत असून, या दबावाला आपण बळी पडणार नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले होते.*

*भारतातून अमेरिकेत धाडल्या जाणार्या मालावर जास्तीत जास्त १५ टक्के आयात शुल्क लागू करावे. तसेच भारत रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे अमेरिकेने लादलेले २५ टक्के शुल्क रद्द करावे, अशी भारताची मागणी आहे. या मागण्या अमेरिका मान्य करेल आणि येत्या जानेवारीतच दोन्ही देशांत करार होईल, अशी अपेक्षा भारताचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केली होती. दुसरीकडे भारताची रशियासोबत मुक्त व्यापार करारासाठीची चर्चा प्रगतिपथावर आहे. त्याचबरोबर रशिया, आर्मेनिया, बेलारूस, कझाकिस्तान आणि किर्गिस्तान हे देश मिळून झालेल्या 'युरेशियन इकॉनॉमिक युनियन'शीदेखील भारत मुक्त व्यापार करार करणार आहे. जेव्हा हा करार प्रत्यक्षात उतरेल, तेव्हा भारताच्या आयात-निर्यात व्यापारात उल्लेखनीय वाढ होऊ शकते. व्हेनेझुएला, इराण यासारख्या देशांना आपण जो धडा शिकवतो, तशीच अद्दल भारताला व्यापाराबाबत घडवू, असे ट्रम्प यांना वाटत असले, तरीदेखील भारत आज जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. परराष्ट्र धोरण राबवताना भारताने नेहमीच आपली तटस्थता आणि स्वातंत्र्य जपले. आपले सार्वभौमत्व टिकवण्यास देश समर्थ आहे. त्यामुळे व्यापार कोंडी अमेरिकेलाच फोडावी लागेल, हे ट्रम्प यांनी लक्षात घ्यावे.*

# कमी खर्च, जास्त उत्पन्न; काकडी पीक ठरतंय वरदान वाचा सविस्तर

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक**

अल्प कालावधीत उत्पन्न देणारे आणि कमी खर्चात चांगला नफा मिळवून देणारे पीक म्हणून काकडीची लागवड शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे, असे मत कृषी विभागाने व्यक्त केले आहे.




विशेषतः जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात पेरणी केल्यास अवघ्या दीड महिन्यात उत्पादन सुरू होते, तसेच बाजारात दरही समाधानकारक मिळतात.

काकडी हे वेलवर्गीय पीक असून उन्हाळी हंगामात त्याची मागणी वाढते. त्यामुळे अल्पभूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी हे पीक उत्पन्नाचे जलद साधन ठरू शकते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**काकडीचे सुधारित वाण**

काकडी पिकात पूना खिरा हा वाण लागवडीनंतर सुमारे दीड महिन्यात फळतोडीस येतो.

हिमांगी हा वाण पूना खिराच्या तुलनेत अधिक उत्पादन देणारा असून फळांना बाजारात चांगला भाव मिळतो.

तर फुले शुभांगी हा वाण केवडा रोगास प्रतिकारक असून अधिक उत्पन्न देणारा असल्याने शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत आहे.

बियाणे, बीजप्रक्रिया व लागवड

काकडी पिकासाठी २ ते २.५ किलो बियाणे प्रति हेक्टरी लागते. चांगले उगवण आणि रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी बीजप्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे.

बिया २४ ते ४८ तास ओल्या फडक्यात किंवा पोत्यात बांधून ठेवाव्यात. त्यानंतर बाविस्टिन २० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात बीजप्रक्रिया करावी, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

दोन वेलींमधील अंतर ४५ ते ६० सेंमी ठेवावे, जेणेकरून वेलांची वाढ चांगली होईल.

**जमिनीची तयारी व खत व्यवस्थापन**

काकडी लागवडीपूर्वी जमिनीचे माती परीक्षण करणे आवश्यक आहे. अन्नद्रव्यांची कमतरता किंवा अतिरेक झाल्यास उत्पादनात घट होऊ शकते.

काकडी पिकासाठी हेक्टरी २५ टन शेणखत, ११० किलो युरिया (लागवडीवेळी), ३०० किलो सुपर फॉस्फेट, ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

**मादी फुलांचे प्रमाण वाढवण्यासाठी उपाय**

काकडी उत्पादन वाढीसाठी मादी फुलांचे प्रमाण वाढणे आवश्यक असते. त्यासाठी पीक दोन व चार पानांच्या अवस्थेत असताना जिब्रेलिक ॲसिड १० ते २५ पीपीएम, किंवा बोरॉन ३ पीपीएम यापैकी एका घटकाची फवारणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

पाणी व्यवस्थापन महत्त्वाचे

काकडी पिकात पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. पाणी देण्यात अनियमितता झाल्यास फुलांची गळ होण्याची शक्यता असते.

फळांची वाढ होत असताना पाण्याचा ताण पडून नंतर अचानक जास्त पाणी दिल्यास फळांना तडे जातात आणि काही वेळा अपक्व फळे गळून पडतात, असा इशारा कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

**फळकूज / फळसड रोगाचा धोका**

काकडीसह भोपळा, कारली, घोसाळी, पडवळ आणि इतर वेलवर्गीय पिकांवर फळकूज किंवा फळसड रोग आढळतो.

हा रोग पिथिअम, फायटोप्थोरा, फ्युजारिअम, रायझोक्टोनिया आणि स्क्लेरोशियम या बुरशीमुळे होतो. त्यामुळे वेळेवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांसाठी फायदेशीर पीक**

थोडक्यात, कमी खर्च, अल्प कालावधी आणि चांगला बाजारभाव या तीनही बाबी लक्षात घेता काकडी हे पीक शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे.

योग्य वाणांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन आणि पाणी नियोजन केल्यास काकडी पिकातून चांगले उत्पन्न मिळू शकते, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

# अस्वच्छ भाज्यांचे सेवन मेंदूसाठीही घातक

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक**

लहान मुलांमध्ये अचानक फिटस् येण्याचे प्रमाण वाढले असून यामागे ताप किंवा आनुवंशिकता यापेक्षाही संसर्गजन्य कारणे अधिक प्रभावी ठरत असल्याचे वैद्यकीय निदानातून समोर येत आहे. लोकसंख्येची घनता आणि






विस्कळीत अन्नपुरवठा साखळी असलेल्या भागांमध्ये मेंदूच्या संसर्गाचे प्रमाण चिंताजनक असून यात न्यूरोसिस्टिकर्सोसिस हा आजार प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहे.

अनेकदा ज्या मुलांच्या मेंदूत जन्मत: कोणताही दोष नसतो, त्यांना अचानक फिटस् येऊ लागल्याने पालकांमध्ये घबराट निर्माण होते. परंतु याचे मूळ जैविक संसर्गात असल्याचे काही चेतापेशी तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. हा आजार प्रामुख्याने डुकराच्या पट्टकृमीच्या म्हणजे टॅनिया सोलियमच्या अंड्यांमुळे होतो आणि बालकांमधील फिटस्चे हे सर्वात सामान्य संसर्गजन्य कारण मानले जाते. या आजाराचा प्रसार होण्याबाबत समाजात अनेक गैरसमज आहेत. मात्र हा संसर्ग केवळ मांस खाल्ल्याने होतो असे नाही, तर तो प्रामुख्याने दूषित माती किंवा अस्वच्छ अन्नाद्वारे शरीरात पोहोचतो.

कोबीसारख्या पानांचे थर असणार्या भाज्या व्यवस्थित धुतल्या नाहीत, तर त्यामध्ये ही सूक्ष्म अंडी अडकून राहतात. महत्त्वाची बाब म्हणजे मेंदूत प्रत्यक्ष जंत जात नाहीत, तर ही सूक्ष्म अंडी रक्ताद्वारे मेंदूपर्यंत पोहोचतात आणि तिथे स्थिरावतात. ही अंडी पोटातील आम्लामध्येही नष्ट होत नाहीत. त्यामुळे ती शरीराच्या अंतर्गत प्रवासात जिवंत राहतात. जेव्हा ही अंडी मेंदूच्या ऊतींमध्ये शिरतात, तेव्हा मानवी शरीर त्यांना बाह्य घटक ओळखून त्याविरुद्ध प्रतिक्रिया देते आणि त्या भागावर सूज येते. ही सूज मेंदूतील विद्युत लहरींच्या कार्यात अडथळा आणते आणि त्यातून फिटस् किंवा झटके येण्याचा त्रास सुरू होतो.

**लक्षणे कोणती?**

या आजाराची सुरुवातीची लक्षणे अत्यंत साधी असल्याने अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांमध्ये सतत होणारी डोकेदुखी, पोटातील बिघाडाशिवाय होणार्या उलट्या, अचानक जाणवणारी सुस्ती किंवा वर्तनातील बदल ही या आजाराची पूर्वलक्षणे असू शकतात.

नवीन अभ्यासानुसार, मेंदूतील ज्या भागात ही अंडी पोहोचतात, त्यानुसार मुलाची दृष्टी जाणे किंवा चालताना तोल जाणे असे गंभीर प्रकारही घडू शकतात. तापाशिवाय किंवा पूर्वी कोणताही त्रास नसताना अचानक फिटस् येणे हे या आजाराचे प्रमुख लक्षण मानले जाते. अशा वेळी तातडीने ब्रेन स्कॅनिंग चाचणी करणे गरजेचे असते. यामुळे वेळेवर उपचार करून पुढील गुंतागुंत टाळता येते.

**पूर्णपणे टाळणे शक्य**

न्यूरोसिस्टिकर्सोसिस हा आजार केवळ स्वच्छतेच्या अभावामुळे होणारा आजार असल्याने तो पूर्णपणे टाळणे शक्य आहे. भाज्या नळाच्या वाहत्या पाण्याखाली व्यवस्थित धुणे आणि त्या चांगल्या प्रकारे शिजवून खाणे हाच यावर सर्वात प्रभावी उपाय आहे. ही अंडी उकळत्या तापमानात नष्ट होतात. वैयक्तिक स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची शुद्धता आणि घराभोवतीचे आरोग्यदायी वातावरण या गोष्टींची काळजी घेतल्यास बालकांना या गंभीर समस्येपासून सुरक्षित ठेवता येते.

# पूर्णानगर येथील चार विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ टाकरखेडा संभू-** जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता माहपात्र यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणार्या नन्हे सितारे या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, पूर्णानगर येथील चार विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.



इयत्ता दुसरीची बुशरा फातेमा साबिर शेख (कविता वाचन), इयत्ता तिसरीची ईश्वरी आशिष राजस (कथाकथन), इयत्ता चौथीची धनश्री मोहन कुकटकर (कविता वाचन) तसेच करिष्मा चंद्रशेखर गायगोले (स्पोकन इंग्लिश) यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवला. या सर्व विद्यार्थिनींनी आपली कला व गुणवत्ता प्रभावीपणे सादर केली.

यामध्ये इयत्ता चौथीची करिष्मा चंद्रशेखर गायगोले हिने जिल्हास्तरीय स्पोकन इंग्लिश स्पर्धेत प्राथमिक गटातून द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल गावच्या सरपंच ज्योत्स्नाताई गजेंद्रसिंह गहरवाल, उपसरपंच उमेश महिंगे तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका शीला मसराम, इयत्ता चौथीच्या वर्गशिक्षिका माधुरी वाईन्देशकर, प्रीती जिस्कार व अश्विनी बोबडे यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. विनोबा अँपवर सातत्याने विद्यार्थिनींचे व्हिडिओ अपलोड करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य माधुरी वाईन्देशकर यांनी केले. त्यांच्या या विशेष कार्याबद्दल त्यांना पोस्ट ऑफ द मंथ व स्टार ऑफ द मंथ हे पुरस्कारही मिळाले आहेत.

याशिवाय तालुकास्तरीय समूह नृत्य स्पर्धेतही या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थिनी व शिक्षकवृंदांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# तृतीयपंथी मतदारांची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी महानगरपालिका अमरावती सौम्य शर्मा-चांडक यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील तृतीयपंथी मतदारांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत तृतीयपंथी समाजातील मतदारांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी शंभर टक्के मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला.




बैठकीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी तृतीयपंथी मतदारांचे मतदानातील महत्त्व स्पष्ट करताना, निवडणूक प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे नमूद केले. मतदानाचा हक्क बजावताना कोणत्याही अडचणी आल्यास महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक ती मदत देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी उपस्थित तृतीयपंथी मतदारांनी प्रशासनाच्या उपक्रमाचे स्वागत करत, 'माझे मत, माझा अधिकार' या भावनेतून आगामी महानगरपालिका निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याचे आव्हान स्वीकारले. तसेच समाजातील इतर तृतीयपंथी मतदारांनाही मतदानासाठी प्रेरित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीला स्वीप विभाग प्रमुख तथा शिक्षणाधिकारी महानगरपालिका अमरावती डॉ. प्रकाश मेश्राम, स्वीप सदस्य उज्वल जाधव तसेच महामंडलेश्वर गुड्डी ताई, तृतीयपंथी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमामुळे तृतीयपंथी मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# खानापूर येथे इसमाची गळफास लावून आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ मोर्शीः-** मोर्शी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खानापूर येथे मंगळवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास दिनेश बन्सीलाल धुर्वे (वय २६) या इसमाने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मृतक दिनेश धुर्वे यांची पत्नी गेल्या आठ दिवसापासून माहेरी गेली होती. दिनेश राहत्या घरात आई-वडिलांसोबत राहत होता. मंगळवारी सायंकाळी सहा सात वाजताच्या दरम्यान आई वडील सोबत जेवण केल्यानंतर खोलीत झोपण्याकरिता गेला होता. मृतकाची आई दरवाजा बंद करण्याकरिता गेली असता मुलगा दिनेश गळफास लावून



लटकलेल्या अवस्थेत दिसून आला होता. याबाबतची माहिती मोर्शी पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा करून मृतदेह रात्रीच मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता. बुधवारी सकाळी शवविच्छेदन झाल्यानंतर मृतक दिनेश धुर्वे च्या मृतदेहावर शोकाकुल वातावरणात खानापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतकाच्या मागे पत्नी, लहान मुलगा आई वडील असा शोकाकुल परिवार आहे. मोर्शी पोलिसांनी या प्रकरणी मर्ग दाखल केला असून अधिक तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

# कीटकनाशक प्राशन करून शेतकऱ्याची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ अमरावती** - वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सालोरा (बु.) गावात नापीकीं आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या एका ६५ वर्षीय शेतकर्याने घरातच कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. मृत शेतकर्याचे नाव नंदकिशोर रामप्रसाद गौरीहार (वय ६५, रा. सालोरा बु.) असे आहे. घटनेनंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.मृतकाच्या मुलाने दिलेल्या माहितीनुसार, नंदकिशोर गौरीहार यांच्याकडे स्वतःची शेती होती. यावर्षी त्यांनी शेतात सोयाबीन व तूर पिकाची पेरणी केली होती. मात्र अतिवृष्टीमुळे दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. उत्पादन न आल्याने ते मानसिक तणावात होते. पेरणीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, या चिंतेत ते दिवसेंदिवस अंतर्मुख झाले होते व कोणाशीही फारसे बोलत नव्हते. कर्जबाजारीपणाच्या चिंतेतूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत आहे. या प्रकरणी मुलाच्या जबाबावरून वलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# मेळघाटात चिमुकल्यांच्या रक्तात सिकलसेलचे विष

## धारणी-चिखलदऱ्यात ८०० मृत्यूच्या दाढेत आनुवंशिक आजार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ चिखलदरा :** मेळघाटातील चटके कुपोषणाचे सोसणाऱ्या धारणी आणि चिखलदरा तालुक्यांसमोर सिकलसेलचे मोठे संकट आता उभे ठाकले आहे. विशेषतः शून्य ते १० वर्षे वयोगटातील लहान मुलांमध्ये या आजाराचे वाढते प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे.



ताज्या आकडेवारीनुसार, या दोन्ही तालुक्यांत तब्बल २८४ चिमुकले प्रत्यक्ष या आजाराने बाधित असून, हजारो मुले या आजाराचे वाहक बनले आहेत. एप्रिल २००९ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार, या दोन्ही तालुक्यांत मोठ्या संख्येने 'कॅरिअर' (वाहक) आणि 'सफरर' (बाधित) रुग्ण आढळून आले आहेत. विशेष म्हणजे, १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये हे प्रमाण चिंताजनक आहे. धारणी आणि चिखलदरा मिळून आतापर्यंत ७,५२९ वाहक आणि ८०३ बाधित रुग्ण समोर आले. प्रशासनाकडून या भागात जनजागृती आणि उपचारांवर अधिक भर देण्याची गरज आहे.

**विवाहापूर्वी कुंडली नव्हे, रक्ताची तपासणी**

प्रशासनाची आकडेवारी असलेल्या डेटावरून असे दिसून येते की, १६ ते २० आणि २० वर्षांवरील वयोगटात अविवाहित वाहकांची संख्या लक्षणीय आहे. सिकलसेल हा आनुवंशिक आजार असल्याने, भविष्यातील पिढीला यापासून वाचवण्यासाठी लग्नापूर्वी रक्ताची तपासणी करणे आवश्यक आहे.

१५ जानेवारीपासून तपासणी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे अरुणोदय ही विशेष सिकलसेल तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. येत्या १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या महिनाभराच्या कालावधीत राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविली जाणार आहे.

### वयोगटानुसार परिस्थिती

**० ते १० वर्षे :** धारणीमध्ये ६६५ वाहक आणि १८५ बाधित मुले आहेत, तर चिखलदऱ्यात ५८७ वाहक आणि ९९ बाधित मुले आहेत.

**११ ते १५ वर्षे :** या वयोगटात धारणीत ५९१ वाहक, तर चिखलदऱ्यात ४२७वाहक रुग्ण आढळले आहेत.

२० वर्षांवरील लोकसंख्या : २० वर्षांवरील विवाहित आणि अविवाहित व्यक्तींमध्येही हे प्रमाण मोठे आहे. एकट्या धारणी तालुक्यात २० वर्षांवरील २,०५६ विवाहित व्यक्ती सिकलसेलच्या वाहक आहेत. राज्यात आतापर्यंत १ कोटी ५ लाख ८६ हजार चाचण्या झाल्या असून, १२,४२० रुग्ण, १ लाख २४ हजार २७५ वाहक आढळले.

# महापालिका निवडणुकीत पैशांचा बोलबाला

## मतांचे विभाजन, बहुरंगी लढत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती–** महानगर पालिका निवडणुकीसाठी गुरुवार आज १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजेपासून मतदान सुरू होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे, तर दुसरीकडे उमेदवारांनी पण आपला प्रचार जोरदार केला आहे. आठ वर्षानंतर होणार्या निवडणुकीसाठी उमेदवारांमध्ये उत्साह आहे. जिंकण्यासाठी उमेदवार जोडतोड करत आहे. विविध प्रभागांमध्ये पैसे देखील वाटले जात आहे. जिंकण्यासाठी उमेदवार सर्व प्रयत्न करत आहे. अमरावती महानगरपालिकेमध्ये बहुरंगी लढत होत आहे. त्यामुळे मतांचे विभाजन होणार हे निश्चित आहे. प्रत्येक उमेदवाराला आपलाा पलडा जड वाटत आहे. निवडणुकीमध्ये भाजप,शिंदे सेना, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या पक्षांमध्ये मुकाबला होत आहे. निवडणुकीची चुरस वाढलेली आहे. आज वैर्याची रात्र आहे. यामुळे आपली बाजू भक्कम करण्यासाठी उमेदवार प्रयत्न करत आहे.मतदारांना पैसे वाटले जात आहे.त्यांना वेगवेगळे प्रलोभन उमेदवारांच्या वतीने देण्यात येत आहे. या संदर्भात निवडणूक विभागाकडे अजून पर्यंत कोणतीही तक्रारी झालेली नाहा पण पैशांचा बोलबाला या निवडणुकीमध्ये दिसत आहे. जागोजागी पैशांचा पूर वाहत आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे वाटण्याची चर्चा जोरावर आहे. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी निवडणूकीमध्ये जिंकण्यासाठी संपूर्ण जोर लावत आहे. जिंकण्यासाठी आपली पूर्ण ताकद लावत आहे. रोमांचक असा मुकाबला अनेक प्रभागात होत आहे. सर्व पार्टीचे उमेदवार जिंकण्यासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे. भाजपा हिंदुत्वाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढत आहे. हा मुद्दा या निवडणुकीमध्ये किती यशस्वी होणार हे तर निकाल लागल्यावर स्पष्ट होणार आहे. शिंदे सेना, अजित पवार गट, काँग्रेस, भाजपा, बसपा या निवडणुकीमध्ये आपली ताकद आजमावत आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी, एमआयएम, युनायटेड फोरम सह इतर पार्टीच्या उमेदवारांनी पण जोरावर प्रचार केलेला आहे.



# नवसारी मतमोजणी केंद्राची आयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडून पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती–** अमरावती महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी नवसारी येथील मतमोजणी केंद्राचे निरीक्षण केले.





आयुक्तांनी या दौर्यादरम्यान मतमोजणी कक्ष, स्ट्राँग रूम, मीडिया सेंटर, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश-निर्गमन मार्ग, वाहतूक व पार्किंग नियोजन, तसेच आपत्कालीन सेवा यांचा सविस्तर आढावा घेतला. मतमोजणी केंद्रात येणार्या अधिकारी, कर्मचारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी व इतर अधिकृत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रवेश व निर्गमन गेट ठेवण्यात आले असून, गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सातही झोनसाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले असून प्रत्येक झोनचा निकाल स्वतंत्रपणे आणि अचूकरीत्या मांडता यावा यासाठी अत्याधुनिक व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीदरम्यान निकाल थेट एलईडी स्क्रीनवर प्रदर्शित होणार असून, नागरिक व माध्यम प्रतिनिधींना त्वरित व पारदर्शक माहिती उपलब्ध होणार आहे.मतपेटच्या व ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रूममध्ये बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त व प्रवेश नियंत्रण प्रणालीमुळे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये याची दक्षता घेतली जात आहे. तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी व एजंट यांच्यासाठी स्वतंत्र, सुव्यवस्थित बसण्याची व निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

माध्यम प्रतिनिधींकरिता सुसज्ज मीडिया सेंटर उभारण्यात आले असून, त्याठिकाणी इंटरनेट, वीजपुरवठा, माहिती फलक व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १५ व १६ जानेवारी २०२६ रोजी होणार्या मतमोजणीदरम्यान पत्रकारांना निकालांची माहिती वेळेवर मिळावी, यासाठी स्वतंत्र समन्वय यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणा, होमगार्ड व सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय वीजपुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, रुग्णवाहिका व वैद्यकीय सुविधा या सर्व बाबींचेही विशेष नियोजन करण्यात आले आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पत्रकारांशी संवाद साधत सांगितले की, मतमोजणीची प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि तत्परतेने पार पडावी यासाठी सर्व व्यवस्थांची काळजी घेतली गेली आहे. गुरुवार, १५ जानेवारी २०२६ आणि दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सातही झोनमध्ये मतमोजणी सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# बडनेरात अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूची विक्री करणार्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार बडनेरा रेल्वे पोलिसांनी दोन दारू विक्रेत्यांवर कारवाई करून मुद्देमाल जप्त केला आहे. बडनेरा रेल्वे पोलीस स्टेशन अंतर्गत मागील एका आठवड्यात अवैधरित्या दारू बाळगून वाहतूक केल्या प्रकरणी २ कारवाई करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये एकूण २ आरोपींविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. निवडणूक पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी बडनेरा रेल्वे पोलीस स्टेशनकडून दक्षता घेण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक अमोल दोंड यांच्या नेतृत्वात कारवाई करण्यात आली.

# घरगुती वादात पत्नीचा पतीवर चाकूने हल्ला

### पंचशील नगरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती** घरगुती वादात पत्नीने पतीवर चाकूने हल्ला केल्याची घटना प्रैजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणार्या पंचशील नगरमध्ये बुधवारी रात्री समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. जखमी पती हरिदास गोविंदराव इंगळे (वय ३५) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार हरिदास इंगळेचे पंचशील नगर मध्ये राहत्या घरी पत्नीसोबत किरकोळ भांडण झाले होते. पाहता पाहता भांडण वाढत गेले आणि रागाच्या भरात त्यांच्या पत्नीने त्यांच्यावर चाकुने हल्ला केला. यामध्ये ते जखमी झाले.जखमी अवस्थेत त्यांनी प्रैजरपुरा ठाण्यामध्ये जाऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले आणि त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून कार्यवाही सुरू केली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा ही केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



# चांदूर बाजार नगर परिषदेत प्रहार जनशक्ती पक्षाचा सत्तारूढ प्रारंभ

## खुर्चीऐवजी स्वच्छता व रक्तदानातून सत्तेचा पहिला दिवस साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ चांदूर बाजार** नगर परिषद चांदूर बाजार येथे आज दिनांक १४ जानेवारी २०२६, बुधवार रोजी प्रहार जनशक्ती पक्षाला बहुमताचा स्पष्ट जनादेश प्राप्त झाल्याने, 'राष्ट्र प्रथम प्रहार जनशक्ती पक्ष प्रणीत लोकशाही आघाडी' या नावाने अधिकृत गट स्थापन करण्यात आला. नगर परिषदेच्या एकूण २१ सदस्यांपैकी नगराध्यक्ष मनीषा मनीष नांगलिया यांच्यासह १६ नगरसेवकांचा गट तयार करण्यात आला असून, गटनेता : सचिन खुळे स्वीकृत नगरसेवक : अजय मलिये व शेख नजीम (प्रिन्स) उपाध्यक्ष : शेख रहमान शेख इब्राहिम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.




सत्तेतील पहिल्याच दिवशी खुर्चीवर बसून कारभार सुरू करण्याऐवजी प्रहार प्रमुख बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर स्वच्छता व सामाजिक उपक्रमातून सत्तेचा नवा आदर्श प्रहार जनशक्ती पक्षाने घालून दिला. याअंतर्गत गाडगेबाबा मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, तेथून बेलोरा ऑटो चौक – किसान पुतळा – जयस्तंभ चौक – नेताजी चौक – गांधी चौक असा संपूर्ण शहरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आला. यानंतर मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये चांदूर बाजार शहरातील तरुण, युवा व महिला मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या वेळी सचिन खुळे, हेमंत कोंडे, अबुदादा वानखडे, एजाज भाई, तनवीर ताज, रहमान भाई, हाजी सोहेल, मुजफ्फर हुसेन, जमील आफताब सर, ॲड. आबिद हुसेन, जमील अहमद, गोपाल वानखडे, घनश्याम उसरबरसे, विनोद कोरडे, मनीष नांगलिया यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रहार तालुका प्रमुख प्रदीप बंड, संजय गोमकाळे, प्रहार महिला आघाडी विदर्भ प्रमुख स्टेला मॅडम, जिल्हा पदाधिकारी लीना गुडघे यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. या भव्य, नावीन्यपूर्ण व लोकाभिमुख प्रयोगामुळे चांदूर बाजारच्या जनतेने

'असाच कारभार अपेक्षित होता' अशी भावना व्यक्त करत बच्चू कडू व त्यांच्या संपूर्ण टीमला बहुमत दिल्याचे समाधान व विश्वास व्यक्त केला आहे.

# व्यास लेआउट येथे घरफोडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ मोर्शी–** व्यास ले-आउट येथील जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त फिर्यादी शिक्षक साहेबराव लक्ष्मणराव पखाले (वय ६४) हे पत्नी व दोन मुली सोबत वेस लेआउट येथे राहतात. मागील आठ दिवसापासून फिर्यादीच्या पत्नीची तब्येत खराब असल्यामुळे तिच्यावर नागपूर येथील एम्स रुग्णालयात औषध उपचार सुरू आहे. पत्नीची देखरेख करण्याकरिता दोन्ही मुली सुद्धा नागपूर येथेच आहे. फिर्यादी दि १३ जानेवारी रोजी मोर्शी येथे आले होते. सायंकाळी सहा वाजता घराच्या सर्व दरवाजे बंद करून मुख्य दरवाजाला कुलूप लावून वरुड तालुक्यातील काचुर्णा येथे मामीकडे मुक्कामी गेले होते. फिर्यादी हे दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता मोर्शी येथे घरी आले असता घराच्या मुख्य दरवाजाला कुलूप आढळून आले नाही. घरात प्रवेश केला असता घरातील इतर खोलीतील सामान व कपडे इतरत्र फेकलेल्या अवस्थेत दिसून आले होते. बेडरूम असलेल्या लाकडी अलमारीतील पत्नीचे २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ४ ग्रॅम वजनाचे सोन्याची कानातले,८ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र असे एकूण ३६ ग्रॅम सोन्याचे दागिने अंदाजे किंमत दोन लाख ५२ हजार रुपयाची चोरी झाल्याचे लक्षात आले तसेच वरच्या मजल्यावरील मुलीचा लॅपटॉप अंदाजे किंमत २० हजार रुपये, असा एकूण २ लाख ७२ हजार रुपयाचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे दिसून आले. त्यामुळे यासंदर्भात तक्रार फिर्यादीने मोर्शी पोलिसात दिली असल्याने अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे. घटनास्थळी श्वान पथक, फिंगरप्रिंट तज्ञ पोहोचले असून तांत्रिकदृष्ट्या तपास सुरू केला आहे.



# बाथरूममध्ये पडल्याने वृद्धाचा मृत्यू

### रवी नगर येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती–** बाथरूम मध्ये पडल्याने जखमी झालेल्या वृद्धचा उपचारादरम्या सुपर स्पेशालिटीमध्ये मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. रमेश लक्ष्मण खंडारे (वय ५७, पंचरत्न अपार्टमेंट,रविनगर ) असे मृतकाचे नाव आहे. माहिती नुसार रमेश लक्ष्मण खंडारे यांचे दोन महिन्यापूर्वी ऑपरेशन झाले होते तेव्हापासून ते घरीच होते. ८ जानेवारीला दुपारी दोन वाजताच्या सुमारास ते बाथरूम मध्ये गेले होते. २० मिनिटानंतरही बाहेर आले नाही. यामुळे त्यांच्या मुलांनी त्यांना आवाज दिला तर त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. यामुळे त्यांच्या मुलाने खिडकी मधून पाहिले तर रमेश खंडारे बाथरूम मध्ये बे शुद्ध पडले होते. मुलाने मोठ्या प्रयत्नाने दरवाजा उघडून त्यांना बाहेर काढले आणि जिल्हा सामान रुग्णालयात दाखल केले. तेथून त्यांना खाजगी रुग्णालयात रेफर करण्यात आले.` त्यांना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.




# रिंगणातील अपक्ष कुणाचे बिघडवणार गणित?

## अमरावतीत १२० अपक्ष उमेदवार मैदानात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती :** अमरावती महापालिकेच्या २२ प्रभागांत ८७ जागांसाठी ६६१ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांचे ५४१ आणि १२० अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. काही उमेदवार असे आहेत ज्यांना पक्षाकडून तिकीट मिळाले नव्हते, तरीही ते निवडणूक मैदानात उतरले आहेत. मात्र अपक्ष उमेदवारांमुळे प्रस्थापित राजकीय पक्षांच्या उमेदवारांचे गणित बिघडण्याची दाट शक्यता आहे. अपक्षांची उमेदवारी ही यंदा निवडणुकीतील समीकरणे बदलू शकतात, असे राजकीय अभ्यासकांचे मत आहे. अमरावती महापालिका निवडणुकीत १९९२ आणि



१९९७ मध्ये अपक्ष उमेदवारांचा बोलबाला होता, हे विशेष.

अमरावती महापालिकेच्या निवडणुकीसाठी केवळ एक दिवस उरलेला आहे. १५ जानेवारी रोजी मतदान तर उमेदवारांच्या बाजूने प्रचार सुरू आहे. तसेच प्रशासनाच्या बाजूनेही तयारी पूर्ण झाली आहे. १९९२ च्या निवडणुकीत काँग्रेसने २७ जागा जिंकल्या होत्या, तर २८ अपक्ष उमेदवार विजयी झाले होते. १९९७ च्या निवडणुकीत २५ अपक्ष उमेदवार विजयी झाले होते, तर २०१७च्या निवडणुकीत केवळ एका अपक्ष उमेदवाराने विजय मिळवला होता.

### अपक्ष उमेदवारांचे 'मैं नही तो तू भी नहीं'

अमरावती महापालिका निवडणुकीत प्रचारादरम्यान २२ प्रभागांत १२० अपक्ष उमेदवारांनी धूम केली. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांना अपक्षांची उमेदवारी प्रचंड त्रासदायक ठरली. यात काही अपक्ष हे राजकीय पक्षांचे बंडखोर म्हणून रिंगणात आहेत. तिकिटासाठी प्रमुख दावेदार असताना काहींचा स्थानिक नेत्यांनी तिकीट न मिळू देण्यासाठी 'गेम' केला. परिणामी बहुतांश नाराज अपक्षांनी उमेदवारी दाखल करून ते निवडणूक रिंगणात आहेत. आता तर 'मैं नहीं तो, तू भी नहीं' अशीच रोखठोक भूमिका अनेक अपक्ष उमेदवारांनी घेतल्याचे चित्र आहे.

**मागील सहा निवडणुकीतील उमेदवारांचा लेखाजोखा**

महापालिका निवडणुकीत १९९२ मध्ये सर्वाधिक २८ अपक्ष उमेदवार विजयी झाले होते. १९९७ मध्ये २५ आणि २००२ मध्ये ५, २००७ मध्ये ७, २०१२ मध्ये ८ आणि २०१७ च्या निवडणुकीत एका उमेदवाराने विजय मिळवला होता.

१९९२ आणि १९९७ च्या निवडणुकीत वॉर्ड प्रक्रिया होती, ज्यामुळे अपक्ष उमेदवारांना अधिक संधी होती. त्यानंतर प्रभाग रचना पद्धतीने मतदान प्रक्रिया सुरू करण्यात आली.

# ६.७७ लाख मतदार ठरवणार शहराचे भवितव्य

## ६६१ उमेदवारांच्या भाग्याचा होणार फैसला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती–** महानगरपालिका निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून आज गुरुवार १५ जानेवारीच्या सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. शहरात एकूण २२ प्रभाग आहेत. ज्यात २१ प्रभाग हे ४ सदस्यीय तर एक प्रभाग ३ सदस्यीय आहे. ८७ नगरसेवकासाठी ६६१ उमेदवार रिंगणात उतरले आहे. ६ लाख ७७ हजार १८० मतदार शहराचे भवितव्य ठरवणार आहे. उमेदवारांचे नशीब आज मतपेटीमध्ये बंद होणार आहे. निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, या करिता शहरात जवळपास ४५०० हजार कर्मचारी नेमण्यात आले आहेत तर ३ हजार पोलीस कर्मचारी तैनात असणार आहेत.२२ प्रभागासाठी २३१ इमारतीमध्ये ८०५ मतदान केंद्र आहे. जेथे मतदार आपले कर्तव्य पार पाडणार आहे. मनपा निवडणूक रिंगणात एकूण ६६१ उमेदवार आपले नशीब आजमावत असून यामध्ये राजकीय पक्षाच्या अधिकृत उमेदवारांसहा १२० अपक्ष उमेदवार रिंगणात आहे. राजकीय गणित पाहता राष्ट्रवादी काँग्रेसचे ८५, काँग्रेसचे ७४, शिवसेनेचे (शिंदे गट)६३, भाजपाचे ६३, वंचित बहुजन आघाडीचे ४७, बहुजन समाज पक्षाचे ३४, युवा स्वाभिमान पक्षाचे ३६, एमआय एमचे २६, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गटाचे १५ व शिवसेना उबाठासह अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या नेतृत्वाखाली ४५०० कर्मचारी बंदोबस्त मध्ये तैनात आहे. प्रत्येक मतदार केंद्रावर सरासरी ८०० ते ९०० मतदारांची सोय करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण मतदारांपैकी महिला आणि तरुण मतदारांची भूमिका निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. विकासाच्या मुद्द्यावर कोण बाजी मारणार हे तर आता निकाल लागल्यावरच स्पष्ट होणार आहे. मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी बुधवारी सकाळी पोलिंग पार्ट्या रवाना झाल्या.



### २६०० पोलीस कर्मचार्यांचा पहारा

निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि भयमुक्त पार पडावी यासाठी ३ उपायुक्त, ७ एसीपी ,९२ एपीआय, पीएसआय, ३१ पोलिस निरीक्षक ,१,६५० अंमलदार आणि महिला पोलिस कर्मचारी निवडणूक कर्तव्यासाठी तैनात करण्यात आले आहेत.संवेदनशील भागांत करडी नजर ठेवण्यासाठी शहरात अतिरिक्त पोलिस दल देखील तैनात केले आहे. सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी शहरात ९०० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी आणि दोन उपविभागीय पोलिस अधिकारी,३ आरसीपी पथक, ४ क्यूआरटी पथक तैनात करण्यात आले आहेत. गुन्हेगारांवर निगराणी ठेवण्यासाठी गुन्हे शाखेचे अधिकार्यांच्या नेतृत्वात ८ पथक नेमण्यात आले आहे. या व्यतिरिक्त एफएसटीचे ८, वीएसटीचे ८ व एसएसटीचे १० पथक नियुक्त करण्यात आले आहे. मनपा हद्दीत २२ प्रभागांमध्ये एकूण ४४ क्षेत्रीय अधिकार्यांसोबत ४४ अंमलदार सतत पेट्रोलिंग करणार आहे.

### उद्या मतमोजणी –

मनपा निवडणुकीची मतमोजणी १६ जानेवारी रोजी डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा संकुल नवसारी येथे ७ झोन निहाय होणार आहे. मतदान आणि मतमोजणीसाठी व्यापक नियोजन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या नेतृत्वात पोलीस विभाग सज्ज आहे. गुरुवारी निवडणूक झाल्यावर उशिरा रात्री पर्यंत मतपेट्या नवसारी येथील क्रीडा संकुल मध्ये पोहोचविण्यात येईल. त्यानंतर दुसर्या दिवशी सकाळी मतमोजणी प्रारंभ होणार आहे.

# महादेवखोरी परिसरात कारमध्ये सापडली रोकड

## निवडणूक रणधुमाळीत 'नोटांचा पाऊस'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती–** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात मतदार खरेदीचा घाणेरडा खेळ सुरू असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात पैशांच्या वाटपाचा प्रकार उघडकीस आल्याने संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. महादेवखोरी परिसरात पोलिसांनी बुधवारी (दि.१४) कारमधून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त केल्याने खळबळ उडाली आहे.



बुधवारी सायंकाळी सुमारे ६ ते ७ वाजताच्या सुमारास प्रैजरपुरा पोलीस ठाण्याचे पथक महादेवखोरी परिसरात पेट्रोलिंग करत असताना एका संशयास्पद कारमध्ये रोकड असल्याची माहिती मिळाली. नागरिकांनीही सहायक निवडणूक निर्णय अधिकार्यांकडे याबाबत तक्रार केल्यानंतर पोलीस व निवडणूक विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. काही वेळ कारचालक अनुपस्थित असताना, नंतर चालक आल्यानंतर कारची झडती घेण्यात आली. तपासणीदरम्यान कारमध्ये दोन ते तीन लाख रुपयांची रोकड आढळून आली. ही रक्कम नेमकी कोणाची आहे, ती कोणासाठी आणि कशासाठी आणली होती, याबाबत कोणतीही ठोस माहिती चालकाकडून देण्यात आली नाही. विशेष म्हणजे, घटनास्थळापासून काही अंतरावर आणखी एक कार आढळून आली, ज्यामध्ये कॅलेंडर व प्रचार साहित्य सापडले. त्यामुळे ही रोकड मतदारांना लाच देण्यासाठीच आणली होती का? असा संशय अधिक बळावला आहे. निवडणूक काळात अशा प्रकारे रोख रक्कम सापडणे हे आदर्श आचारसंहितेची थेट पायमल्ली असल्याचे बोलले जात आहे. शहरात सर्वत्र प्रचाराचा धुरळा सुरू असताना, बंद दाराआड मतदारांची किंमत ठरवली जात असल्याची चर्चा आहे. 'विकास, विचारधारा आणि कामगिरीच्या नावाने मत मागण्याऐवजी नोटांच्या जोरावर सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू आहे का?' असा संतप्त सवाल आता सामान्य मतदारांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, निवडणूक विभागाकडे यापूर्वी कोणतीही अधिकृत तक्रार नसल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र शहरातील अनेक प्रभागांमध्ये पैशांचे खुलेआम वाटप सुरू असल्याच्या जोरदार चर्चा आहेत. महादेवखोरीतील प्रकार हा केवळ किरकोळ असून, पडद्यामागे आणखी किती 'डील' सुरू आहेत, याबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहेत. महापालिका निवडणूक विभागाच्या एसएसटी पथकाने या प्रकरणी प्रैजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील चौकशी सुरू आहे. पोलिस निरीक्षकांसह सहायक पोलीस आयुक्तांनीही या प्रकरणाची दखल घेत तपासाचा वेग वाढवला आहे. लोकशाहीचा उत्सव म्हणवल्या जाणार्या निवडणुकीत पैशांचा वाटप होउै लागल्याने, 'मतदान स्वेच्छेने होणार की नोटांच्या जोरावर?' हा प्रश्न आता अमरावतीकरांच्यावतीने विचारला जात आहे.

# अकोल्यात ५० लाखाची रोकड जप्त

## खदान पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अकोला :** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये मतदान सुरू होण्याच्या काही तास अगोदर खदान पोलिसांनी ५० लाखाची रोख रक्कम बुधवारी रात्री जप्त केली. शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. महापालिका निवडणुकीच्या दरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम बाळगण्याचे कारण काय? याचा तपास पोलीस करीत आहेत. या कारवाईची माहिती महापालिका निवडणूक विभाग व प्राप्तिकर विभागाला देण्यात आली. मतदानाच्या पूर्वी घडलेल्या या घटनेमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली.

अकोला शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत मोठ्या प्रमाणात रोकड आणली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून खदान पोलिसांनी सापळा रचत ५० लाख रुपयांची रोख रक्कम बुधवारी रात्री विद्या नगर भागातून जप्त केली आहे. ही रक्कम बाळगणार्या एका व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. या ५० लाख रुपयांच्या रोख रकमेचा वापर महापालिका निवडणुकीसाठी होत आहे का? याचा सुद्धा तपास केला जात आहे.

अकोला महापालिकेची निवडणूक तब्बल नऊ वर्षांनी होत आहे. महापालिकेच्या २० प्रभागांतील ८० जागांसाठी ४६९ उमेदवार मैदानात आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी विविध प्रभागांमध्ये चुरशीच्या लढती होत आहेत. अनेक ठिकाणी तिरंगी व चौरंगी लढतीची रंगत आहे. महापालिका निवडणुकीमध्ये मतदारांचे पाठबळ मिळण्यासाठी उमेदवारांकडून अतोनात प्रयत्न केले. १५ जानेवारीला शहरातील ६३० मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरू होईल.

### सखोल चौकशी सुरू

५० लाख रुपयांची रोख रक्कम पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे. ही रक्कम नेमकी कोणाची, त्याचा वापर कशासाठी होणार होता? याचा सविस्तर तपास व चौकशी केली जात आहे. निवडणूक विभाग व प्राप्तिकर विभागाला देखील याची माहिती दिली. तपासानंतर रकमेबाबत नेमके सांगता येईल, असे खदान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांनी सांगितले.

# सावधान : नायलॉन मांजामुळे अपघातांची भीती

## प्रशासनाची कारवाई सुरू

**टाकरखेडा संभू–** मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग उडविण्याचे प्रमाण वाढले असून नायलॉन मांजामुळे गंभीर अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आजपासून पुढील दहा दिवस नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दुचाकी चालविताना लहान मुलांना होंडा, बाईक किंवा ॲक्टिव्हाच्या पुढील बाजूस बसवू नये, तसेच वाहनाचा वेग कमी ठेवावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

नायलॉन मांजा अतिशय तीक्ष्ण असल्याने यापूर्वी जिल्ह्यात अनेक नागरिकांचे जीव गेले असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. गळ्याला,



हाताला किंवा चेहर्यावर मांजा लागल्यास जीवघेणे परिणाम होऊ शकतात. त्यामुळे दुचाकीस्वारांनी गळ्याभोवती उबदार मफलर किंवा रुमाल बांधणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे, जेणेकरून अचानक मांजा लागल्यास गंभीर इजा टाळता येईल.

विशेष म्हणजे, शासनाने नायलॉन मांजावर बंदी घातलेली असतानाही जिल्ह्यात सर्रासपणे नायलॉन मांजाची विक्री होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. याची गंभीर दखल घेत प्रशासनाने आता कारवाईला सुरुवात केली असून नायलॉन मांजा विक्री करणार्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई, जप्ती तसेच गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया राबविली जात आहे.

नागरिकांनी कायद्याचे पालन करावे, नायलॉन मांजाचा वापर टाळावा आणि सुरक्षित कागदी किंवा कापसाच्या मांजाचाच वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हा संदेश नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांपर्यंत पोहोचवून अपघात टाळण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

# टाकरखेडा शंभू-साऊर रस्त्यावर नालीचे सांडपाणी

## नागरिकांना मोठा त्रास; ग्रामपंचायतीचा सतत पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ टाकरखेडा संभू–** टाकरखेडा संभू गावातून रामा ते साऊरकडे जाणार्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील मुख्य रस्त्यावर नालीचे घाण पाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरून दररोज शाळकरी मुले, महिला, वृद्ध नागरिक तसेच वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र रस्त्यावर साचणार्या सांडपाण्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून दुर्गंधीमुळे आरोग्याच्या समस्याही निर्माण होत आहेत.

विशेषतः पावसाळा व सध्याच्या दिवसांत रस्त्यावर पाणी साचल्याने चिखल तयार होतो. शाळेत जाणार्या लहान मुलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असून वाहन घसरून पडण्याचे प्रकारही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामस्थांकडून या समस्येबाबत वारंवार तक्रारी करण्यात येत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत टाकरखेडा संभू ग्रामपंचायतीने सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम



विभागाच्या अंतर्गत येत असल्याने संबंधित विभागाला पत्रव्यवहार करून समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीमार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी नाराजी ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

सदर रस्त्यावरील नालीचे पाणी त्वरित योग्य पद्धतीने वळवावे, निचरा व्यवस्था सुधारावी व रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामपंचायत व नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल न घेतल्यास नागरिकांचे आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# कुठे बोगस मतदान, कुठे मशीनमध्ये घोळ तर कुठे पैसे वाटप म्हणे लोकशाहीचा उत्सव, राज्यात मतदानाच्या दिवशी जोरदार राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जळगाव शहरातील आर. आर. विद्यालय येथील मतदान केंद्रावर बोगस मतदानाच्या आरोपामुळे आज गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रभाग क्रमांक पाचमध्ये अपक्ष उमेदवार ड. पियुष पाटील आणि शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख, माजी महापौर विष्णू भंगाळे यांच्यात थेट लढत सुरू आहे. सकाळपासून संशयास्पद मतदार आल्याचा आरोप करत ड. पियुष पाटील यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार केली.

त्यानुसार ४० ते ४५ मतदारांकडून ओळखपत्र आणि आवश्यक पुरावे मागवण्यात आले. मात्र, ते सादर न होऊ शकल्याने संबंधितांना मतदान करू देण्यात आले नाही. या प्रभागात सुमारे तीन हजारांहून अधिक बोगस आणि दुबार मतदार असल्याची तक्रार आपण यापूर्वीही केल्याचा दावा पाटील यांनी केला. या प्रकाराची प्रशासनाने गंभीर दखल घेऊन योग्य खबरदारी घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली असून या सर्व घडामोडींमुळे आर. आर. विद्यालयातील मतदान केंद्रावर काही काळ तणावपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.



अकोल्यातल्या एका मतदान केंद्रावर उमेदवारांच्या प्रतिनिधींमध्ये वाद झाला आणि वादांचं रूपांतर किरकोळ हाणामारीमध्ये झाले. अकोला महापालिकेतील प्रभाग १७ मधील भांडपुरा चौकातल्या महापालिकेच्या उर्दू कन्या शाळेच्या मतदान केंद्रावरील हा प्रकार घडला आहे. या मतदान केंद्रावर लोकांची मोठी गर्दी होती. दरम्यान, पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने पोलिसांच्या हस्तक्षेपांनंतर परिस्थिती नियंत्रणात आली. दरम्यान पोलिसांनी मतदान केंद्राबाहेर जमलेली गर्दी पांगवली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आली असून मतदान केंद्रावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त वाढवला गेला.

संभाजीनगर मध्ये मतदान प्रक्रियेदरम्यान गोंधळ उडाला आहे. संभाजीनगर शहरातील नारेगाव परिसरात मतदान यंत्रावरील बटन काम करत नसल्याने उमेदवारांनी संताप व्यक्त केला आहे. तर मतदारांच्या मोठ्या प्रमाणात या ठिकाणी रांगा लागल्या आहेत. आम्ही किती वेळ रांगेत उभे राहायचे असा प्रश्न मतदारांनी निवडणूक अधिकाऱ्यांना केला आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील मतदान केंद्र क्रमांक १५ मध्ये हा सगळा प्रकार घडला आहे. दरम्यान एमआयएमचे उमेदवार काकासाहेब काकडे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना मतदान केंद्रात जाऊन जाब विचारला आहे.

बोगस मतदानाचा आरोप करत एका महिलेने मतदान केंद्रावर चांगलाच राडा घातला आहे. तसेच राडा घातल्यानंतर तिने निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांची गाडी देखील रोखून धरली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील कल्पतरू ह्या उच्चभ्रू लोकांच्या सोसायटी मधील मतदान केंद्रावर हा धक्कादायक प्रकार घडला आहे. मतदार यादीत नाव नाहीत मतदार याद्या व्यवस्थित नाहीत. उमेदवाराला न विचारता एतच् मशीन वरील स्टिकर निवडणून विभागाने काढले तसेच बदलून टाकले आहते. असा आरोप शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचे नातेवाईक विद्या जवळकर यांनी केला आहे.या सर्व आक्षेप विषयी विद्या जवळकर या महिलेने निवडणूक विभागाकडे तक्रार केली होती मात्र तिच्या तक्रारीची निवडणूक विभागाने हवी तशी दखल न घेतल्याने तिने मतदान केंद्रावर चक्क राडा घालून निवडणूक विभागाची गाडी रोखून धरली आहे.

# मतदार यादीत प्रचंड गोंधळ अनेक मतदार मतदानापासून वंचित

## मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह, मात्र नावे नसल्याने गोंधळाची स्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह दिसून येत असला तरी मतदार यादीतील प्रचंड गोंधळामुळे अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मतदानासाठी केंद्रांवर पोहोचलेल्या अनेक मतदारांची नावे यादीत आढळून न आल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.काही मतदारांची नावे मागील यादीत होती; मात्र अद्ययावत मतदार यादीत ती वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले. तर काही ठिकाणी नावातील चुका, पत्त्यात बदल किंवा प्रभाग फेररचनेमुळे मतदारांना मतदान केंद्र शोधण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिक उत्साहाने बाहेर पडले असताना यादीतील त्रुटींमुळे त्यांचा वेळ वाया जात असून काहींना मतदान न करता परतावे लागण्याची वेळ येत आहे. याबाबत निवडणूक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मतदारांकडून केली जात आहे.दरम्यान, संबंधित मतदान केंद्रांवरील कर्मचारी मतदारांना माहिती देण्याचा प्रयत्न करत असले तरी यादीतील गोंधळामुळे अडचणी कायम असल्याचे चित्र आहे. निवडणूक प्रक्रियेतील या त्रुटी दूर करून प्रत्येक पात्र मतदाराला मतदानाचा अधिकार मिळावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.



## मतदान केंद्रात उमेदवारांमध्ये शाब्दिक चकमक; शाळा क्रमांक १३ येथे तणाव

अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२६ अंतर्गत आज सकाळपासून मतदानास सुरुवात झाली असून, प्रभाग क्रमांक ८ मधील शाळा क्रमांक १३ येथील मतदान केंद्रावर उमेदवारांमध्ये शाब्दिक वाद झाल्याचे चित्र समोर आले आहे.निवडणूक रिंगणातील काही उमेदवार मतदान केंद्राच्या आतमध्ये उपस्थित राहून मतदारांना विनंती करत असल्याचा आरोप करण्यात आला. याच कारणावरून विविध पक्षांच्या उमेदवारांमध्ये शाब्दिक चकमक झाली. या मतदान केंद्रावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, डीएसपी आणि एमआयएम या पक्षांचे उमेदवार उपस्थित असल्याने वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले होते.मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त असतानाही उमेदवार बराच वेळ केंद्राच्या आतमध्ये थांबल्यामुळे वाद अधिक वाढल्याचे सांगितले जाते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.सध्या मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू असून, निवडणूक नियमांचे पालन करण्याच्या सूचना उमेदवारांना देण्यात आल्या आहेत. प्रशासनाने कोणत्याही अनुचित प्रकारास आळा घालण्याचा इशारा दिला आहे.घटनास्थळी पोलीस आयुक्त निवडणूक अधिकारी दाखल झाल्यानंतर प्रकरण शांत झाले.



# तत्कालीन सचिव आणि लेखापाल यांच्यावर ५० लक्ष रु. ची जबाबदारी निश्चित

## रक्कम वसूल करून प्रशासकीय कारवाईचे डीडीआर यांचे आदेश; अचलपूर बाजारसमितीला बहुप्रतिक्षित ४० ब चा अहवाल प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजारसमितीला जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) शंकर कुंभार यांचा बहुप्रतिक्षित ४० (ब)चा अहवाल प्राप्त झाला असून तत्कालीन सचिव आणि लेखापाल यांच्यावर ५० लक्ष रुपयांची जबाबदारी निश्चित करीत रक्कम वसुलीचे आदेश बजावले आहे. त्यामुळे सहकार वर्तुळात खळबळ माजली आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी आणि विक्री (विकास आणि नियमन) कायद्याचे कलम ४० (ब) अन्वये प्रशासकीय काळामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचे बाजारसमितीचे लेखा परीक्षण करून अहवाल सादर करण्याची जबाबदारी श्रीमती स्वाती गुडधे, सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रभारी) यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्या अनुषंगाने स्वाती गुडधे यांनी सादर केलेला अहवाल अतिशय धक्कादायक आहे. सदर चौकशी अहवालात अमरदीप वानखडे तत्कालीन प्रभारी सचिव व ज.ल. गुळदे, लेखापाल यांच्यावर संयुक्त रु. ३७ लक्ष ९१ हजार ५०२ रुपयांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अमरदीप वानखडे तत्कालीन प्रभारी सचिव यांच्यावर वैयक्तिक रु. १० लक्ष ४ हजार १८४ रुपये व ज.ल. गुळदे, लेखापाल यांच्यावर वैयक्तिक २लक्ष १२ हजार १०३रुपये एवढी वसुली दर्शविण्यात आली आहे.




### बाजारसमितीवर प्रशासक राज असताना मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार

झाल्याचे प्रथमदर्शनी लेखापरीक्षणात पुढे आले होते. त्यामुळे याबाबत अधिक स्पष्टता आणि वैधता यावी, यासाठी ४० (ब) अन्वये लेखापरीक्षण करण्यात आले. त्यामध्ये कायद्यानुसार सर्व पुरावे तपासून लेखा परीक्षकांनी आपला अहवाल तयार करीत त्यामध्ये उपरोक्त दोन्ही कर्मचाऱ्यांकडून ५० लक्ष रुपयांची वसुली करण्यासाठी आणि संबंधांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने दोन्ही कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

**सौ. प्रतिभा प्रशांत ठाकरे, सभापती बाजारसमिती**

### कारवाईबाबत डी. डी. आर यांचे आदेश

कर्मचाऱ्यांकडून चौकशी अहवालात दर्शविण्यात आलेली संपूर्ण रक्कम वसुलीकरिता आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच सदर कर्मचाऱ्यांवर बाजारसमिती उपविधी व कर्मचारी सेवा नियमातील तरतुदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करून अहवाल या कार्यालयास सादर करावा, असे आदेश डीडीआर शंकर कुंभार यांनी पत्राद्वारे बाजारसमितीला दिले आहे.

# जिल्ह्यात ६,२७४ बचतगटांना २८०.५६ कोटींचे कर्जवाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जिल्ह्यातील महिला सहायताबचतगटांना सक्षम करून त्यांना स्वयंरोजगार व उद्योगाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) माध्यमातून बँकांमार्फत कर्जपुरवठा करण्यात येत आहे. या आर्थिक वर्षांत ६,२७४ महिला बचतगटांना २८० कोटी ५६ लाख ७२ हजारांचे कर्ज वाटप केले आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत महिला बचतगटांना सक्षम करण्याकरिता विविध उपक्रम राबवित आहे. त्यांना उद्योजक बनवित त्यांच्या उत्पादनाला प्रदर्शनाच्या माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करून दिल्या जात आहे. जिल्ह्यात सीईओ संजिता महापात्र व प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या मार्गदर्शनात मेळघाट हाट, वैदर्भी स्मार्ट तयार करून अनेक बचतगटांच्या उत्पादनाला येथे स्थान दिले आहे. याशिवाय त्यांना मोठे उद्योग उभारण्याकरिता देखील बँकामार्फत कर्ज दिल्या जात आहे.सन २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात जिल्ह्यातील एकूण ९,२७० महिला बचतगटांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. यापैकी आतापर्यंत ६,२७४ बचतगटांना तब्बल २८० कोटी ५६ लाख ७२ हजार रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. या कर्जाच्या माध्यमातून महिला बचतगटांनी लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, किराणा दुकाने, शिवणकाम, खाद्यप्रक्रिया, अगरबत्ती निर्मिती, हस्तकला आदी विविध व्यवसाय सुरू केले आहेत.या आर्थिक सहाय्यामुळे महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली असून कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होत आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांमध्ये बचतीची सवय, सामूहिक निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुण विकसित होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागातील महिलांचा आत्मविश्वास वाढला असून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनत आहेत.


# चार महिन्यांपासून मानधन नाही, आता कंत्राटींनी काढली किडनी विकायला

## अमरावती येथील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांची आपबीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जिल्हा परिषद पाणीपुरवठा स्वच्छता विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे गेल्या चार महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. मानधनासाठी अनेकदा आंदोलने केल्यानंतरही शासनाकडून दखल घेतली गेली नसल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी किडनी विकण्याचा पवित्रा घेतला आहे.

ग्रामीण जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनमध्ये गेल्या १५ ते २० वर्षांपासून कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे गेल्या ४ महिन्यांपासून वेतनाविना त्यामुळे त्रस्त राहण्याची वेळ ओढवली आहे. कर्मचाऱ्यांनी किडनी घेता का कोणी किडनी... असा पवित्रा घेतला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांनी हा मुद्दा जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्यापासून ते थेट या विभागाच्या मंत्र्यांपर्यंत पोहोचविला. परंतु याची कुठल्याही प्रकारे दखल घेतली जात नसल्याची खंत या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. पाणी व स्वच्छता मिशन या विभागात ५० हून अधिक कर्मचारी आहेत. यापैकी ४२ कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या चार महिन्यांपासून झाले नाही. आज ना उद्या वेतन मिळेल, या अपेक्षेवर त्यांनी आपली नियमित कामे सुरूच ठेवली आहेत. परंतु चार महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही वेतन न झाल्याने अलीकडे त्यांना आर्थिक चणचणीला तोंड द्यावे लागत आहे.



कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या वेतनाबाबत मी संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना गेल्या आठवड्यातच पत्र पाठविले. परंतु अद्याप काहीही तोडगा निघाला नाही. बुधवारी पुन्हा त्यांच्याशी संपर्क साधला असून, स्मरणपत्रही देत आहे. याबाबत लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे.

**– संजीता महापात्र, मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद.**

**उदरनिर्वाह झाला कठीण**

गेल्या चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने साधारणतः ६० लाख रुपये थकीत आहेत. घरी लागणारा किराणा, कपडे आदी त्यांनी उधारीवर प्राप्त केले, परंतु मुलांच्या शाळांचे शुल्क, वृद्धांचे औषधोपचार आदी बाबींसाठी मात्र त्यांची मोठी कसरत होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या ३ मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी शासनाशी चर्चा करून हा मुद्दा सोडवावा, अशी मागणी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांनी केली आहे.

# शेतातील विहिरीत फाशी घेऊन संपवली जीवन यात्रा तिवसा तालुक्यातील डेहनी गावात हृदयद्रावक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

तिवसा तालुक्यातील डेहनी गावात काल अत्यंत दुर्दैवी व मन हेलावून टाकणारी घटना घडली. शेतातील विहिरीत पाणी ओढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या खिराडीला फाशी घेऊन शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या घटनेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव सुरेश माणिकराव माळोदे (वय ५५), रा. डेहनी, ता. तिवसा असे आहे. माळोदे हे मजुरी काम करायचे शेतात मजुरी करण्याकरिता गेले असता रात्री उशीर झाला परंतु वडील घरी न आल्यामुळे मुलगा गावात शोधत शेतात पाहायला गेल्यामुळे ही घटना उघडकीस ६.३० दरम्यान आली गेल्या काही वर्षांपासून सततची नापिकी, शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च व कर्जाचा डोंगर अशा अनेक शेतीसंबंधी आर्थिक अडचणींमुळे ते प्रचंड विवंचनेत होते. या संकटांमधून मार्ग काढता येत नसल्याने त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा गावात होत आहे.

सुरेश माळोदे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार असून त्यांच्या आत्महत्येमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे डेहनी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी वर्गात तीव्र संताप व निराशा पसरली आहे.घटनेची माहिती मिळताच पीएसआय भागानगरे साहेब व पोलीस कॉन्स्टेबल संतोष अढावू यांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला असून पुढील तपासासाठी अहवाल पाठवण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

# सिकलसेल आजारावर निबंध स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती:**

जिल्हा परिषद आरोग्य विभाग अमरावती आणि महाराष्ट्र राज्य आरोग्य सहाय्यक/निरीक्षक कर्मचारी संघटना वतीने सिकलसेल आजार या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सिकलसेल आजाराविषयी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या वतीने, अरुनोदय सिकलसेल अनिमिया विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संबंधित स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही निबंध स्पर्धा खुल्या गटातील निशुल्क स्वरूपात असून,स्पर्धेला शब्दमर्यादा नाही.स्पर्धेचे प्रथम बक्षीस एकहजार, द्वितीय बक्षीस सातसे रुपये, तर तिसरे बक्षीस चारसे रुपये. असून पहिल्या पन्नास स्पर्धेकांना प्रमाणपत्र वितरित केले जाणार आहे.बक्षीस वितरण एका मोठ्या कार्यक्रमात विविध मान्यवरांचे हस्ते केले जाणार असून,स्पर्धेचे निबंध,दिनांक ७/२/२६ परेंत वनिता शिंदे आरोग्य विभाग. जिल्हा परिषद कॅम्प रोड,कोर्ट समोर,अमरावती. ता. जी. अमरावती.या पत्त्यावर पाठवावे अथवा स्वतः पोच करावे. व अधिक माहितीकरिता ८३२९०९५९०३/९७६४३४१०३१ या नंबरवर संपर्क करावा.असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या स्पर्धेमध्ये मोठ्या प्रमाणात शाळा,महाविद्यालय व नागरिकांनी भाग घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा संजिता माहपात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले. संघटनेचे राज्याध्यक्ष धर्मा वानखडे यांनी केले आहे.

# शासनाच्या श्रावणबाळ योजनेच्या लाभापासून १० वर्षीय वृद्ध वंचित

## न्यायाकरिता २६ जानेवारीला उपोषणाची तयारी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अंजनगाव सुर्जी**

शासनाच्या श्रवणबाळ योजनेच्या लाभांपासून स्थानिक १० वर्षीय वृद्ध वंचित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. स्थानिक मनीराम गंगारामजी राऊत (९०) रा. खिडकीपुरा, अंजनगाव सुर्जी यांची अंजनगाव तहसील कार्यालयात श्रवणबाळ सेवा योजना अंतर्गत प्रस्ताव मंजूर झाला होता. त्यांना शासनाकडून तेराशे रुपयाचा दर महिन्याला लाभ मिळत होता. परंतु, गेल्या एक वर्षापासून त्यांचा लाभ बंद झाला आहे. सद्यस्थितीत त्यांचे वय १० आहे. याबाबत येथील तहसील कार्यालयात चौकशी केली असता आधार कार्डवर त्यांचे वय ६२ असल्याने त्यांचा लाभ बंद झाल्याचे स्थानिक संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयातून सांगण्यात आले आहे. मनीराम गंगारामजी राऊत हे अशिक्षित असून त्यांचे शिक्षण झाले नसल्याने त्यांच्याजवळ शाळेचा जन्म तारखेचा दाखला नाही. परंतु, त्यांच्याजवळ जन्म तारखेची कोतवाल बुकाची नक्कल आहे. परंतु कोतवाल बुकाच्या नक्कलच्या आधारे आधार कार्डवरील जन्मतारीख दुरुस्त होत नाही. आधारकार्डवरील जन्मतारीख दुरुस्त करण्यासाठी शाळेचाच दाखला पाहिजे असल्याने या ९० वर्षीय वृद्धासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आधार सेतू केंद्रात शाळेची टीसी मागतात. अशा या तांत्रिक अडचणीम्ळे ९० वर्षीय वृद्ध शासनाच्या श्रावणबाळ योजनेच्या सेवा लाभांपासून जवळपास एक वर्षापासून वंचित आहे. कधी तहसील कार्यालय तर कधी सेतू केंद्र येथे चकरा मारून हे नव्वद वर्षीय वृद्ध हैराण झाले आहे. उतार वयातील आयुष्याच्या ह्या सायंकाळी न्याय मिळेल का ही आशा घेऊन २६ जानेवारीला अंजनगाव तहसील कार्यालयासमोर हे ९० वर्षीय वृद्ध उपोषणाला बसण्याच्या तयारीत आहेत.

# श्रीक्षेत्र वरखेड येथे पूज्य मंजुळा मातेचा ९० वा पुण्यतिथी महोत्सव भक्तिभावात सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा –(वरखेड)**

परमहंस श्री सद्गुरु आडकुजी महाराज यांच्या कृपाछायेत आणि वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यस्मरणाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र वरखेड येथे पूज्य मातोश्री मंजुळा माता यांचा ९० वा पुण्यतिथी महोत्सव बुधवार दि. १४ ते शुक्रवार दि. १६ जानेवारी दरम्यान भक्तीभाव, श्रद्धा आणि सेवाभावाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.या पवित्र महोत्सवाची सुरुवात बुधवारी प्रभाती पूज्य श्री संत मंजुळा मातेच्या दिव्य प्रतिमेस विधीवत महाअभिषेक व तीर्थस्थापनेने झाला आहे.हा मंगल सोहळा सौ. शोभाताई पुरुषोत्तम पाटील यांच्या शुभहस्ते पार पडला असून, या दिव्य कार्यक्रमाचा लाभ समस्त भाविक-भक्तांनी घ्यावा, असे जाहीर आवाहन श्री आडकुजी महाराज संस्थानचे अध्यक्ष अभिजीतदादा बोके, सचिव मनोहर बोके तसेच विश्वस्त मंडळींनी केले आहे.या पुण्यतिथी महोत्सवाचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा संपूर्ण कार्यक्रम महिलांच्या सहभागातून व नेतृत्वाखाली पार पडतो. नियोजन, स्वच्छता, पूजा-अर्चा, अभिषेक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी ही सर्व जबाबदारी गावातील महिला भगिनी मोठ्या निष्ठेने आणि सेवाभावाने सांभाळतात या महोत्सवात धार्मिक का र्यक्रमांसह सामाजिक उपक्रम, शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमही पुण्यपरंपरा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सुरू केलेली असून, त्या काळापासून आजतागायत वरखेड गावातील महिलांनी ती प्रामाणिकपणे, नित्यनेमाने जपली आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.अडकुजी महाराज संस्थान हे 'जगाचं पावर हाऊस' असल्याची भावना गावकऱ्यांकडून व्यक्त केली जात असून, या पुण्यतिथी महोत्सवामुळे गावासह परिसरातील भाविकांमध्ये आध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले आहे.






# लोकशाहीचा महाउत्सव...

**गेल्या ९वर्षांपासून न घेण्यात आलेल्या अमरावती महानगर पालिका निवडणूक आज पार पडली. या लोकशाहीच्या उत्सवात अमरावतीकरांनी भरभरून अस मतदान केले. दुपार नंतर अनेक मतदान केंद्रावर लांबच लांब रांगा लागल्याचे आज पहावयास मिळाले. सकाळी थोडं संथ गतीने मतदान झाले मात्र त्यानंतर अनके मतदान केंद्रावर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.मात्र एकाच मतदाराला चार वेळी मतदान करावयाचे असल्याने स्लम प्रभागात गोधळ उडाला. तर काही मतदान केंद्रावर आपलं नावच यादीत नाव नसल्याकारणाने मतदार मतदानापासून वंचित राहिले.तर काही ठिकाणी ईव्हीएम मशीनचा क्रम हा उलटा लावण्यात आला होता त्यामुळे हि गोधंळ व शाब्दिक बाचाबाची पहावयास मिळाली**




## ईव्हीएम बंद पडल्याने गोंधळ; शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचा मतदान केंद्रात राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीदरम्यान प्रभाग क्रमांक १७ मधील गडगडेश्वर शारदा विद्यालय येथील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन अचानक बंद पडल्याने मोठा गोंधळ उडाला. ईव्हीएम मशीन बंद पडल्यानंतर तात्काळ मशीन का बदलण्यात आली नाही, असा सवाल करत शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराने मतदान केंद्रात प्रवेश करून



आक्रमक पवित्रा घेतला.ईव्हीएम बंद पडल्यामुळे मतदान प्रक्रियेत खंड पडला असून मतदारांचा वेळ वाया जात असल्याचा आरोप उमेदवाराने केला. यावेळी मतदान केंद्रात जोरदार वादावादी झाली. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तात्काळ मध्यस्थी करत उमेदवारासह उपस्थित सर्वांना मतदान केंद्राबाहेर काढले.दरम्यान, या प्रकारामुळे काही काळ मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली होती. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून पुढील प्रक्रिया सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची विविध मतदान केंद्रांना भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळपासून शहरातील सर्व प्रभागांमध्ये मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पहाटेपासूनच अनेक मतदान केंद्रांवर मतदारांनी रांगा लावून उत्स्फूर्तपणे आपला मतदानाचा हक्क बजावण्यास प्रारंभ केला असून संपूर्ण शहरात निवडणुकीबाबत उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात एकूण ८०५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, सावलीची व्यवस्था, तसेच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत व वेळेत पार पडावी, यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर प्रशिक्षित निवडणूक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.दरम्यान, अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी आज सकाळी शहरातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी मतदान केंद्रांवरील सुविधा, मतदान यंत्रांची स्थिती, मतदारांसाठी करण्यात आलेली



व्यवस्था तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांचे कामकाज यांचा सविस्तर आढावा घेतला. मतदान प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व शांततेत पार पडावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून शहरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून सर्व मतदान केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासन सतर्क असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.मतदान प्रक्रिया शांततेत, सुरक्षित व नियोजित वेळेत पार पडावी, यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासन, निवडणूक यंत्रणा, पोलीस प्रशासन तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी समन्वयाने कार्यरत आहेत. नागरिकांनी निर्भयपणे व उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.








# मतदान हे लोकशाहीतील मूल्ये....

संत गाडगेबाबा – पीडीएमसी प्रभाग स्थित प्रगती विद्यालय, राधा नगर ( गाडगे नगर ) मतदान केंद्रावर आमदार सौ. सुलभाताई खोडके व आमदार – संजय खोडके यांनीआपल्या परिवारासह जाऊन मतदानाचा हक्क बजावला.

मतदान हे लोकशाहीतील मूल्ये, नैतिकता आणि जवाबदारी यांची बाजू घेण्याचे साधन आहे. असा संदेश देत खोडके कुटुंबीयांनी यावेळी दिला.तर दुसरीकडे आमदार रवी राणा यांनी आपल्या गंगा सावित्री या निवासस्थानावरून मतदान केंद्रापर्यंत सायकल चालवीत पर्यावरण बचाओ चा संदेश दिला.त्यानंतर राणा दाम्पत्यान आपला मतदानाचा हक्क बजावला व नागरिकांनी हि आपल्या घराच्या बाहेर पडत मतदान करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

